**विशेष खटला नं. ३६/२०२४**
**म. सरकार वि. सचिन अशोक वाकसे**
**नि. क्र. ९०.**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. २ यांचा पुरावा</u>**

मी शपथेवर सांगते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | रामराव चांगदेव मुनफन |
| वय | – | ५५ वर्षे, |
| व्यवसाय | – | व्यवसाय. |
| राहणार | – | केडगांव, जि. अहमदनगर. |

**<u>सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. डी. ढगे यांच्यामार्फत सरतपास सुरु.</u>**

१. मी दिनांक ४/८/२०२३ रोजी सिव्हील हॉस्पीटलला सकाळी ९.०० वा. हजर होतो. मला पंच होण्याबाबत विचारले होते. इतर पंच महादेव देवरे पण हजर होते. डेडबॉडी विशाल धेंडे यांची होती. मी पाहिले की शर्ट उघडलेला होता. पॅन्ट अर्धवट दुमडलेली होती, नाकातून पिवळा स्त्राव होत होता. आमच्यासमोर दिसत्या डेडबॉडीचा पंचनामा केला. पंचनामा वाचल्यानंतर आम्ही सहया केल्या. आता मला मरणोत्तर पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ९१** देण्यात आली.

सरतपास संपला.

**<u>उलटतपास आरोपी नं. १ तर्फे वाणी तर्फे सुरु.</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ९१ मध्ये पॅरा. नं. १ ए. डी. / एफ. आय. आर. नं. १० चे ऐवजी १९ केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, तिथे कोणी इनिशियल केलेले नाही. माझे घर आणि सिव्हील हॉस्पीटल यामधील अंतर ४ ते ५ कि.मी. आहे. मला आमचे दुस–या ड्रायव्हरने फोन केला म्हणून मी सिव्हील हॉस्पीटलला गेलो. मयताचे वडिल हे आमच्याकडे ड्रायव्हर म्हणून होते. मी सकाळी ९ ते ९.३० वा. सिव्हील हॉस्पीटलला गेलो. मी तिथे १ तास होतो. मी १०.३० चे आतच पंचनाम्यावर सही केली.

असे म्हटले तर बरोबर होईल का की तुम्ही सिव्हील हॉस्पीटलला नव्हते.

उत्तर मला नक्की वेळ आठवत नाही. १० .३०

३. मी शवगृहात डेडबॉडीजवळ गेलो होतो. डेडबॉडीही शवगृहात टेबलवर होती

ती स्ट्रेचरवर नव्हती. मला आठवत नाही की, डेडबॉडी पंचनाम्यात नमूद केल्याप्रमाणे स्ट्रेचर होती किंवा काय

४. मी हे पाहिले नाही की, डेडबॉडीवर लालसर रंगाच्या जखमा होत्या का मला हे सांगता येणार नाही की, मृतकाच्या शरीरावर कशा प्रकारच्या जखमा होत्या. मला ताज्या जखमा आणि जुन्या जखमा यातील फरक कळतो.

**प्रश्न ः** मृतकाच्या शरीरावरचे सर्व कपडे काढून तुम्हाला डेडबॉडी दाखविली होती का

**उत्तर ः** मी त्यावेळेस हजर नव्हतो.

५. जेव्हा मी डेडबॉडी पाहिले तेव्हा ती अध्र्या वस्त्रात होती. जखमांचे मोजमाप माझ्यासमोर केले नाही. मी डेडबॉडीवर ताजी जखम पाहिली नाही. मृतकाचे सर्व अवयव मरणोत्तर पंचनामा निशाणी ९१ चे कॉलम नं. १२ मध्ये व्यवस्थित असल्याचे नमूद केले आहे. मी हे सांगू शकत नाही की, तिथे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते किंवा नाही. असे काही घडले नाही की, मी काही सांगत होतो आणि पोलीसांनी लिहून घेतले. पोलीसांनी पंचनामा लिहिला आणि माझी शवगृहाच्या बाहेर सही घेतली. आणि मी सही केली कारण मयताचे वडिल आमचे ड्रायव्हर होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमोर कोणताही पंचनामा करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगितलेले सर्व खोटे आहे.

**आरोपी नं. २ तर्फे वकील श्री. शेलोत पुकारले असता गैरहजर.**

**आरोपी नं. २ ला उलटतपासाबाबत विचारले असता आरोपी नं. १, ३ व ४ यांनी घेतलेला उलटतपास स्विकृत केला.**

**उलटतपास आरोपी नं. ३ व ४ तर्फे अॅड. एस. एस. गुगळे तर्फे सुरु.**

६. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्यावेळी मी केडगाव येथे रहात होतो. केडगांव ते सिव्हील हॉस्पीटल अंतर हे खूप लांब आहे. सिव्हील हॉस्पीटल व केडगांव हे दोन्ही विरुध्द दिशेला आहे. पोलीस स्टेशनला जाण्याचे कोणतेच कारण नाही. मयताचे वडील आमचे ड्रायव्हर होते. माझी पोलीसांशी गाठभेट सिव्हील हॉस्पीटलला झाली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस म्हणाले की, पंचनामा करायचा आहे मला तिथे सहया करायचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी दिसती परिस्थिती पाहून पंचनामा केला. हे म्हणणे खरे आहे की, मला डेडरुममध्ये जाण्याचा कोणतेही कारण घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पंचनामा केला आणि माझ्याकडे सहयांसाठी दिला. हे म्हणणे खरे आहे की, मी डेडबॉडी

३...

बघितली होती. मी पोलीसांसोबत अर्धा ते पाऊणतास होतो. मला हे माहित नाही की, अशी चर्चा चालू होती की मयत हा त्याच्या जुन्या आजाराने मृत पावला. असं घडलं नाही की, आमच्या सर्वांचे असे मत झाले की, मयत हा जुन्या आजाराने मृत पावला. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, त्या पंचनाम्यामध्ये असे नमूद आहे की, मयताला त्याच्या जुन्या आजाराने नैसर्गिक मृत्यू आला असे सर्वांना वाटते. या व्यतिरिक्त मयताचा मृत्यू कशामुळे झाला हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यावर फक्त सही केलेली आहे.

उलटतपास नाही.

फेरतपास पूर्ण.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.

दि. १३/०८/२०२६.

समक्ष

**(एम. एस. भदाने)**
**तदर्थ जिल्हा न्यायाधीश, व अति. सत्र न्यायाधीश, अहमदनगर.**

**विशेष खटला नं. ३६/२०२४**
**म. सरकार वि. सचिन अशोक वाकसे**
**नि. क्र. ९२.**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा पुरावा</u>**

मी शपथेवर सांगते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | मुनीर अब्दुल शेख |
| वय | – | ४८ वर्षे, |
| व्यवसाय | – | रिक्षाचालक |
| राहणार | – | आनंदनगर, जि. अहमदनगर. |

**<u>सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. डी. ढगे यांच्यामार्फत सरतपास सुरु.</u>**

१. दिनांक ४/८/२०२३ रोजी आम्हाला पंचनाम्यावर सहया करण्यासाठी बोलाविले होते. त्यादिवशी दुसरा पंच सचिन कुमार माधवसिंग हा आमच्यासोबत हजर होता. आम्हाला लोहमार्ग पोलीस स्टेशनला बोलाविले होते. मी पोलीस स्टेशनला पंचनाम्यावर सही केली. आता मला पंचनामा दाखविले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ९३** देण्यात आले. मला पंचनाम्यातील मजकूर माहित नाही.

**<u>साक्षीदार तपासात मदत करीत नसल्याने सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन साक्षीदारास उलटतपासात जसे प्रश्न विचारतात तसे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.</u>**

२. मी ९वी पर्यंत शिकलेलो आहे. मला मराठी इंग्रजी लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी कागदपत्रे वाचल्याशिवाय मी सही करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी रेल्वे स्टेशनच्या हद्दीतच रिक्षा चालवतो. हे म्हणणे खरे आहे की, मी तिथे सर्वांना आणि पोलीसांनाही ओळखतो. या गुन्हयातील आरोपी वाकसे, करणलाही मी ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी नं. ३ ला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ४/८/२०२३ रोजी आम्हाला पोलीसांनी रेल्वे स्टेशनच्या ओव्हर ब्रीजला नेले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला नेले तिथे खडीवर रक्ताचे डाग होते. हे म्हणणे खरे नाही की, रक्ताचे डाग असलेली खडी आमच्या समक्ष जप्त केली.

३. मला हे आठवत नाही की, मला ५/८/२०२३ रोजी पुन्हा पोलीस स्टेशनला बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मयताचे अंगावरील कपडे आमच्या समक्ष जप्त केले. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही

आहे. त्यास **निशाणी ९४** देण्यात आले. मला पंचनाम्यातील मजकूर आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचे असल्यामुळे मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पुराव्या अगोदर आरोपी करण सोबत बोलत होतो.

सरतपास संपला.

**उलटतपास आरोपी नं. १ तर्फे वाणी तर्फे सुरु.**

४. हे म्हणणे खरे आहे की, मी लोहमार्ग परिसरात रिक्षा चालवित असल्यामुळे मी पोलीसांना ओळखतो. मला त्यांना ओळखण्याचे दुसरे कोणतेही कारण नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांना मी पंच म्हणून हवे असल्यास मी जावून सही करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनाम्यावर सही करतांना त्यातील मजकूर वाचत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी करण सोबत केस बाबत काहीही बोलत नव्हतो.

**आरोपी नं. २ चे वकील श्री. शेलोत यांनी उलटतपास घेण्यास नाकारले.**

उलटतपास नाही.

**उलटतपास आरोपी नं. ३ व ४ तर्फे अॅड. एस. एस. गुगळे यांनी उलटतपास घेण्यास नाकारले.**

उलटतपास नाही.

फेरतपास पूर्ण.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत. समक्ष

दि. १३/०८/२०२६.

**(एम. एस. भदाने)**
**तदर्थ जिल्हा न्यायाधीश, व अति. सत्र न्यायाधीश, अहमदनगर.**